जा.क्रं./जिउकेंजा/जिउमिसस/२०१०/
कार्यालय, महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, जालना
दि.

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

विषय- दि.२१.०१.२०१० रोजी संपन्न झालेल्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा इतिवृत्त...

महोदय,

मा. जिल्हाधिकारी तथा उद्योग उप-आयुक्त, जालना यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.०१.२०१० रोजी दु. ११.३० वाजता संपन्न झालेल्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत जिल्हा कार्यपथक बल समिती सभा इतिवृत्तांत यासोबत जोडण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

सोबत-वरीलप्रमाणे इतिवृत्त प्रत.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा,
जिल्हा उद्योग केंद्र, जालना.

प्रत-

१. जिल्हा राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र अधिकारी, जालना यांना देऊन विनंती करण्यात येते की, यासोबतच्या सी. डी. मधील पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा इतिवृत्त जालना जिल्हयाच्या संकेतस्थळावर ( http://jalna.nic.in ) उपलब्ध करण्यात यावे, तसेच, सध्या उपलब्ध असलेल्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम इतिवृत्तास ओव्हरराईट करुन अपलोड करावे, ही विनंती.

२. मा. जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना माहितीस्तव.

**जिल्हा उद्योग केंद्र, जालना**
**दि.२१.०१.२०१० रोजी दु. ११.३० वाजता संपन्न झालेल्या**
**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**
**जिल्हा कार्यपथक समिती सभेचा इतिवृत्तांत**

दि.२१.०१.२०१० रोजी दु. ११.३० वाजता मा. श्री. विलास ठाकूर (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, जालना यांच्या अध्यक्षतेखाली ( P. M. E. G. P. ) जिल्हा कार्यपथक बल समिती सभा संपन्न झाली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. विलास ठाकुर (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा कार्यपथक बल समिती, जालना
२. श्री. अ. र. चांदोरीकर, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा कार्यपथक बल समिती, जालना.
३. श्री. बागवान, जिल्हा अग्रणी अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्य शाखा, जालना.
४. श्री. भाऊसाहेब रामदास काकडे, सभापती पंचायत समिती, भोकरदन
५. श्री. डी. एस. मोरे, जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी, जालना.
६. श्री. जी.बी.दंदे, प्राचार्य, आय.टी.आय. जालना.
७. श्री. बी. जी. भगत, जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मंडळ, जालना
८. श्री. भास्कर कोल्हे, जिल्हा युवा समन्वयक, नेहरु युवा केंद्र, जालना.
९. श्री.पी.एल.मेंढे, जिल्हा समन्वय अधिकारी, खादी ग्रामोद्योग आयोग, मुंबई.

सर्वप्रथम कार्यपथक बल समितीचे सदस्य सचिव श्री. अनिलकुमार चांदोरीकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात केली.

१. दि.९.१२.२००९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

२. योजनेच्या अंमलबजावणीसाठी असलेल्या दोन संस्था-अ) जिल्हा उद्योग केंद्र ब) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे उद्दिष्ट व त्याची सभा दिनांकापर्यन्तची प्रगती ( लक्षांक, बँकनिहाय शिफारस, मंजूर प्रकरणे व उर्वरित गाठावयाचा लक्षांक ) याबाबत मा. अध्यक्षांनी आढावा घेतला. आढाव्याअंती मंजूर व वाटप कर्ज प्रकरणांचे प्रमाण कमी असल्याबद्दल मा. अध्यक्षांनी असमाधान व्यक्त केले. उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने तत्काळ प्रयत्न करण्यात यावेत, असे सुचविले. शहरी भागात मंजूर प्रकरणांच्या तुलनेत कर्ज वाटप प्रकरणांची संख्या कमी असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले . त्यावर महाव्यस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी कर्ज मंजूर झालेल्या लाभार्थीना प्रशिक्षण दिल्याशिवाय कर्ज वाटप करता येत नसल्याचे सांगुन आता संबंधीत लाभार्थीना प्रशिक्षण दिले असुन कर्ज वाटप प्रकरणांची संख्या वाढेल असे सांगितले. शहरी / ग्रामिण भागात ज्या बँक शाखाना उद्दिष्टाच्या दीडपट प्रकरणे पाठवीलेली नाहीत अशा बँक शाखाना तत्काळ कर्ज प्रकरणे शिफारस करण्यांत यावीत असे मा. अध्यक्षांनी सुचविले. यावर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,जालना यांनी जिल्हा उद्योग केंद्रासाठी असलेल्या ग्रामिण भागाच्या उद्दिष्ट पुर्ततेसाठी फक्त उद्योगाची कर्ज प्रकरणे प्राप्त होत नसल्याने सेवा उद्योग व व्यवसायाची कर्ज प्रकरणे स्विकारावी लागतील असे सांगितले. त्यास मा.अध्यक्षांनी मान्यता दिली. त्याच प्रमाणे यापुढे प्राप्त होणारी कर्ज प्रकरणे संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांनी डायरेक्ट शिफारस करावीत व या कर्ज प्रकरणांना पुढील सभेत कार्योत्तर मान्यता घेण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले. परंतू असे करतांना संबंधीत बँक शाखाना उद्दिष्टाच्या दिड पटीपेक्षा जास्त प्रकरणे शिफारस होणार नाहीत याची दक्षता संबंधीत अमंलबजावणी यंत्रणांनी घ्यावी असे ठरविण्यांत आले.

३. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा भोकरदन व मंठा या जिल्हा उद्योग केंद्रासाठी ग्रामिण भागात येणा-या शाखांना संबंधीत जिल्हा समन्वयक यांनी उदिष्ट वाटप केलेले नसल्याचे महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सांगितले त्यावर चर्चो होऊन जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी या बाबत तत्काळ कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सुचविले.

४. जिल्हा उद्योग केंद्राकडे प्राप्त पाच प्रकरणांवर चर्चा होऊन सर्व प्रकरणांना मान्यता देण्यात आली. परंतू अ क्रं .४ वरील डीटीपी जॉब वर्क / इंटरनेट कॅफे या प्रकल्पाची दर्शविलेली कर्ज मागणी जास्त वाटते असे मा.अध्यक्षांनी सांगुन संबंधीतांनी सादर केलेले कोटेशन, प्रकल्प अहवाल यांची छाननी करुन आवश्यकते नुसार प्रकल्प किंमत शिफारस करावी. तसेच अ.क्रं. ५ बाबत महाव्यवस्थापक जि उ के यांनी संबंधीताची

मुलाखत घेऊन जागे बाबत पडताळणी करावी व  नंतरच कर्ज प्रकरण शिफारस करावे असे सर्वोनुमते ठरले. तसेच या प्राप्त पाच प्रकरणांत ज्या  बँकाची नांवे सुचविण्यांत आलेली आहेत त्या बँक शाखांना उदिष्टाच्या दिड पट प्रकरणे शिफारस  झाली असतील तर ही प्रकरणे दुस-या उदिष्टाच्या दिडपट प्रकरणे शिफारस न झालेल्या बँक  शाखांना शिफारस करण्यांत यावीत असे मा.अध्यक्षांनी सांगितले. सर्व मंजुर प्रकरणांमध्ये लाभार्थ्यांना कर्ज रक्कम मंजूर केल्यानंतर प्रशिक्षण द्यावे लागते म्हणून सदरील योजनेचे मंजुरी बँकांनी तात्काळ जिल्हा उद्योग केंद्रास कळवावी असे मा.अध्यक्षांनी सुचविले .

५. खादी ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांचेकडे प्राप्त झालेल्या २४ कर्ज प्रस्तावावर चर्चा होऊन त्यांना देण्यांत आलेल्या ३० प्रकरणांचे उदिष्ट व आता पर्यंत शिफारस कर्ज प्रकरणांची संख्या लक्षात घेता  सर्वच प्रकरणांना मान्यता देण्यांचे सर्वानुमते ठरले.

६. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी  स्टेट बँक ऑफ इंडिया  जालना शाखेने पुर्वी  श्री. अमित सखाराम मिसाळ यांच्या  पाणी पाऊच व बॉटल तयार करणे या रु. २५.०० लाखाच्या  कर्ज  प्रस्तावास नॉट फिजीबल म्हणुन परत पाठविलेल्या व आता तेच प्रकरण रु.१०.०० लाखाच्या  प्रकल्प किंमतीस फिजीबल ठरवुन सदरील प्रकरण शिफारस करण्यांची विनंती करणा-या बँकेच्या   प्रस्तावाची माहीती सभागृहास दिली. यावर चर्चा होऊन सदरील प्रकरण येत्या बँक अधिका-याच्या सभेत ठेवण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

७. मा.अध्यक्षांनी योजनेतील प्रगती  लक्षात घेता संबंधीत सर्व  बँक अधिका-यांची एक सभा दि.८.२.१०  नंतर घेण्यांत यावी असे जिल्हा अग्रणी व्यवस्थापक यांना सुचित केले. तसेच ज्या   बँक  शाखांनी या योजनेचे काहीही काम केलेले नाही.  त्या बँक शाखा अधिका-यांनाही या सभेस बोलविण्यांत यावे असे ठरले. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक यांनी योजनेच्या प्रगती बाबत वेळोवेळी बँक शाखांचा  आढावा घ्यावा असे मा .अध्यक्षांनी सुचविले.

८. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जालना कार्यालयाकडील प्राप्त (९०)  प्रकरणांवर चर्चा होऊन त्यापैकी (१८)  प्रकरणांना मान्यता देण्यात आली. उर्वरीत (७२)  प्रकरणे समितीच्या  पुढील बैठकीत ठेवण्यांत यावीत असे ठरले. तसेच ज्या बँकांना लक्षांका प्रमाणे प्रकरणे पाठविण्यांत आलेली नाहीत अशा प्रकरणांची स्वतंत्र यादी तयार करुन त्या यादीस मा.जिल्हाधिकारी जालना यांची मंजूरी घेऊन नंतर ती प्रकरणे संबंधीत बँकांना पाठविण्यांत यावीत  असे ठरले.

९. जोशाबा ग्रामीण औद्योगिक संस्थेची  ३१ उद्योजकांच्या  प्राप्त प्रकरणांपैकी २२ उद्योजकांच्या मागील सभेत ठरल्यानुसार मुलाखती घेण्यांत आल्या. त्यांची कर्ज प्रकरणे समिती समोर मंजूरीसाठी ठेवण्यांत आली असता त्यापैकी  १५ कर्ज प्रकरणांना मंजूरी देण्यांत आली सदरील प्रकरणे संबंधीत बँकांना शिफारस करण्यांत यावीत असे ठरले.

सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम,**
**कार्यपथक समिती,जिल्हा उद्योग केंद्र, जालना.**

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम,**
**कार्यपथक समिती, जालना.**

* * * * *

**दिनांक -**

सादर-

**विषय - पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा दि. २१-०१-२०१० चे इतिवृत्त...**

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा दि.२१-०१-२०१० चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर.

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा,**
**जिल्हा उद्योग केंद्र, जालना.**

**मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सभा,**
**जालना.**